MHWR040017552025

# निशाणी क्र. ०३ वरील आदेश

अर्जदाराने मूळ अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे संक्षिप्त स्वरुपात “सदर अधिनियम”) चे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तुत अर्जाद्वारे तिने सदर अधिनियमाचे कलम २३ सह कलम २०(१)(घ) अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

२. अर्जातील थोडक्यात कथन असे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक १९.०५.२००६ रोजी झाला असून विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदारासोबत नांदत होती. सदर विवाहापासून अर्जदार व गैरअर्जदार यांना तीन अपत्ये असून त्यामध्ये कु. पूर्वा शंकर पेटकर वय १७ वर्षे, कु. नम्रता शंकर पेटकर वय १६ वर्षे व नैतिक शंकर पेटकर वय १५ वर्षे अशी अपत्ये आहेत. अर्जदारचे म्हणणे असे आहे की, विवाहानंतर सुरुवातीच्या काळात अर्जदार ही गैरअर्जदारासोबत वैवाहिक संसार करीत होती. मात्र, कालांतराने गैरअर्जदार याचा अर्जदाराशी वागण्याचा व्यवहार बदलला व तो अर्जदारास शारीरिक, मानसिक व आर्थिक स्वरुपाचा त्रास देऊ लागला. गैरअर्जदार हा अर्जदाराशी व्यवस्थित वागत नाही, तिची चांगली वागणूक देत नाही तसेच अनेक कारणांवरुन तिच्याशी भांडण करीत असतो. अर्जदार ही घरातील कामकाज व संसाराची सर्व जबाबदारी सांभाळत असतानाही गैरअर्जदाराकडून तिच्या गरजा पूर्ण करण्यात येत नाहीत. अर्जदाराचे पुढे म्हणणे असे की, गैरअर्जदार हा तिला मानसिक त्रास देत असून तिच्याशी अपमानास्पद पध्दतीने वागत आहे. अर्जदारने तिच्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे, गैरअर्जदाराकडून

अर्जदारस आवश्यक त्या प्रकारे अन्न, औषधोपचार, कपडे व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करुन देण्यात येत नाहीत. तसेच अर्जदारास घरातील व संसारातील कोणतीही योग्य मदत किंवा आर्थिक सहाय्य करण्यात आलेले नाही.

३. अर्जदारचे पुढे म्हणणे असे की, गैरअर्जदाराकडून अर्जदारस सतत शारीरिक व मानसिक त्रास दिला जात असल्यामुळे अर्जदारला वैवाहिक घरात राहणे कठीण झाले. गैरअर्जदार हा अर्जदारास विविध प्रकारे त्रास देत असे व तिला अपमानास्पद वागणूक देत असे. अर्जदारने तिच्या मुलांसह आपल्या माहेरी राहण्यास सुरुवात केल्यानंतरही गैरअर्जदाराने अर्जदार व तिच्या मुलांच्या पालनपोषणाची कोणतीही योग्य व्यवस्था केलेली नाही. अर्जदार व तिची मुले यांना आवश्यक असलेला खर्च, अन्न, औषधोपचार, कपडे व इतर जीवनावश्यक वस्तू गैरअर्जदाराकडून पुरविण्यात आलेल्या नाहीत. अर्जदारचे पुढे म्हणणे असे की, अर्जदार माहेरी राहत असल्यामुळे गैरअर्जदाराने तिच्याशी कोणताही संपर्क ठेवला नाही व तिच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही रक्कम दिलेली नाही. गैरअर्जदाराने अर्जदार व मुलांच्या जबाबदारीपासून स्वतःस अलिप्त ठेवले आहे. अर्जदारने सदर वागणुकीबाबत संबंधित पोलीस पाटीलांना माहिती देऊन मदत मागितली असून, दिनांक १२.०६.२०२५ रोजी पोलीस पाटील कन्हापूर येथे गैरअर्जदारासंबंधी माहितीपत्र देखील अभिलेखावर दाखल आहे. अर्जदारचे म्हणणे असे की, गैरअर्जदाराकडून अर्जदारस तसेच तिच्या मुलांना आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने अर्जदारस सदर अधिनियमाच्या तरतुदींनुसार संरक्षण व आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. अर्जदार ही तिच्या मुलांसह सध्या वेगळी राहत असून त्यांचा सर्व खर्च करण्याची जबाबदारी अर्जदारवरच आली आहे. अर्जदारचे म्हणणे असे की, तिच्या मुलांचे शिक्षण सुरू असून त्यांच्या अन्न, वस्त्र, औषधोपचार व शिक्षणाचा खर्चही अर्जदारस करावा लागत आहे. गैरअर्जदाराने अर्जदार व मुलांच्या पालनपोषणासाठी कोणतीही नियमित आर्थिक मदत

केलेली नाही. अर्जदारने गैरअर्जदाराकडे वैवाहिक नाते व संसार पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला असला तरी गैरअर्जदाराने त्यास सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही.

४. अर्जदारचे पुढे म्हणणे असे की, गैरअर्जदार याचा व्यवसाय शेती असून त्यास त्यातून उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार यांच्या शेतावर मोबाईल टॉवर असून सदर मोबाईल टॉवरपासून गैरअर्जदार यास दरमहा रु.६,०००/- इतके उत्पन्न मिळते, असे अर्जदारने नमूद केले आहे. गैरअर्जदार यांचेकडे सुमारे २.५ एकर ओलीताची शेती असून त्यापासूनही त्यांना उत्पन्न मिळते, असे अर्जदारने नमूद केले आहे. अर्जदार हिस स्वतःचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार ही सध्या माहेरी राहत असून तिच्या व तिच्या तीन मुलांच्या पालनपोषणाची संपूर्ण जबाबदारी तिच्यावरच आहे. अर्जदारच्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्येही तिला कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमूद केले आहे. अर्जदारने तिच्या स्वतःच्या व मुलांच्या सर्वसाधारण खर्चासाठी दरमहा सुमारे रु.१०,०००/- खर्च येत असल्याचे नमूद केले आहे. अर्जदारचे पुढे म्हणणे असे की, गैरअर्जदाराने अर्जदार व मुलांसाठी नियमितपणे अन्न, औषधोपचार, कपडे, निवास व इतर जीवनावश्यक गरजांचा खर्च केलेला नाही. त्यामुळे अर्जदार व तिच्या मुलांच्या उदरनिर्वाहाचा व निवासाचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. गैरअर्जदाराकडे अर्जदार व मुलांच्या पालनपोषणासाठी आवश्यक आर्थिक साधन उपलब्ध असूनसुद्धा तो त्याची जबाबदारी पार पाडत नाही. सबब, अर्जदार हिस गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा रुपये १०,०००/- अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती अर्जदार करीत आहे. तसेच अर्जदारने सदर अधिनियमाच्या कलम १८, १९, २० व २२ अन्वये योग्य ते संरक्षण, निवास, आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळण्याची विनंती केली आहे.

५. गैरअर्जदार हा प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.८ अन्वये विधिज्ञ यांचेमार्फत हजर

झाला. परंतु, त्याने प्रस्तुत अर्जासंदर्भात त्याचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. त्यामुळे गैरअर्जदार विरुद्ध प्रस्तुतचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

६. अर्जातील कथनांच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात. सदर मुद्यांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| (१) | अर्जदार हिने गैरअर्जदाराकडून तिचा कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केले आहे का? | .. | होकारार्थी. |
| (२) | अर्जदार ही स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ असल्याचे आणि गैरअर्जदाराकडे पुरेसे उत्पन्न असल्याचे अर्जदाराने सिध्द केले आहे काय? | .. | होकारार्थी. |
| (३) | अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का? असल्यास किती? | .. | होय दरमहा रु.६,०००/– |
| (४) | आदेश काय? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१** :

७. अर्जदाराचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारातर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही. अर्जातील कथने व अर्जदारने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. तसेच अर्जदारचे मालमत्ता व दायित्व शपथपत्रचे अवलोकन केले.

८. सदर अधिनियमाचे कलम २३ अन्वये अर्जाचा विचार करत असताना न्यायालयास मूळ अर्जाच्या गुणदोषांचा आणि चौकशी दरम्यान येवू शकणाऱ्या संभाव्य

पुराव्याचा विचार करण्याची व त्यासाठी सखोल जाण्याची आवश्यकता नाही. अंतरिम पोटगीची दाद मिळण्यास पात्र ठरण्याकरीता अर्जदार हिने सर्वात अगोदर गैरअर्जदाराकडून तिचा कौटुंबिक हिंसाचार होत आला आहे, हे सकृतदर्शनी दाखवून देणे गरजेचे असते.

९. अर्जदाराने अर्जामध्ये तसेच कौटुंबिक हिंसा घटना अहवालामध्ये तिचेवर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत घटनाक्रम कथन केला आहे. त्यामध्ये, विवाहानंतर गैरअर्जदाराने अर्जदार हिला सुरुवातीस चांगली वागणूक दिल्यानंतर लहान–सहान कारणावरुन तिच्याशी वाद घालणे, तिला मानसिक त्रास देणे, तिच्याशी शिवीगाळ करणे, दारुचे सेवन करुन घरी येऊन अर्जदार हिच्याशी भांडण करणे व तिला मारहाण करणे, तसेच अर्जदार व तिच्या मुलांना त्रास देणे, अशा कथनांचा प्रामुख्याने समावेश आहे. गैरअर्जदार यास दारुचे व्यसन असून तो नेहमी दारु पिऊन अर्जदार हिच्याशी वाद घालून तिला मारहाण करीत असल्याचे अर्जदारने नमूद केले आहे. तसेच गैरअर्जदार याने अर्जदार हिचेवर विविध प्रकारे शारीरिक व मानसिक अत्याचार केले असून, त्याच्या अशा वागणुकीस कंटाळून अर्जदार ही तिच्या मुलांसह माहेरी निघून आल्याचे तिचे म्हणणे आहे. अर्जदारने पुढे असेही कथन केले आहे की, गैरअर्जदार याचे वर्तन काही काळ नातेवाईकांच्या मध्यस्थीने व्यवस्थित झाले होते. मात्र, त्यानंतर पुन्हा गैरअर्जदार याने दारु पिऊन अर्जदार हिच्याशी भांडण करणे, तिला शिवीगाळ करणे व मारहाण करणे सुरु केले. दिनांक १६.०५.२०२५ रोजी गैरअर्जदार हा दारु पिऊन घरी आला व त्याने अर्जदार हिच्याशी कारण नसताना वाद घालून तिला कंबरपट्ट्याने मारहाण केल्याचेही अर्जदारने नमूद केले आहे. सदर सततच्या शारीरिक व मानसिक त्रासास कंटाळून अर्जदार ही तिच्या मुलांसह माहेरी निघून आली असून, त्यानंतर गैरअर्जदार हा अर्जदार व तिच्या मुलांना भेटण्यास अथवा त्यांची विचारपूस करण्यास आलेला नाही, असेही अर्जदारने कथन केले आहे. अर्जदारने असेही नमूद केले आहे की, गैरअर्जदार याने अर्जदार हिच्या तसेच

मुलांच्या पालनपोषणाची कोणतीही योग्य आर्थिक व्यवस्था केलेली नाही. औषधोपचार व इतर जीवनावश्यक वस्तूंसाठी आवश्यक आर्थिक मदतही त्याच्याकडून करण्यात आलेली नाही. अर्जदार हिचे आई–वडील तिचा व तिच्या मुलांचा सांभाळ करीत असून, त्यांची परिस्थितीही अशा प्रकारे कायमस्वरुपी पालनपोषण करण्यास सक्षम नसल्याचे अर्जदारने नमूद केले आहे. अर्जदारने सदर कथनांच्या पुष्ठ्यर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर अधिनियमाचे कलम २३ अन्वये सदर प्रतिज्ञापत्र कौटुंबिक हिंसाचाराच्या शाबीतीसाठी पुरेसे आहे.

१०. गैरअर्जदाराने प्रस्तुत प्रकरणी त्याचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदारने केलेल्या कथनांना विरोध करणारा कोणताही पुरावा सदर टप्प्यावर अभिलेखावर आलेला नाही. गैरअर्जदार यास पती म्हणून अर्जदारच्या पालनपोषणाची असलेली कायदेशीर जबाबदारी टाळता येणार नाही. एकंदरीत अर्जदारची कथने, तिचे प्रतिज्ञापत्र तसेच अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्री पुरावा विचारात घेता, गैरअर्जदाराकडून अर्जदार हिचा शारीरिक, मानसिक व आर्थिक स्वरुपाचा त्रास झाल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. तसेच गैरअर्जदार याचे दारुचे सेवन, दारु पिऊन अर्जदार हिच्याशी वाद घालणे, शिवीगाळ करणे व तिला मारहाण करणे, तसेच दिनांक १६.०५.२०२५ रोजी अर्जदार हिच्यास मारहाण केल्याचे कथन विचारात घेता, गैरअर्जदाराकडून अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार होत आल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.२** :

११. अर्जदार तिचे अर्जामध्ये आणि मालमत्ता व दायित्व शपथपत्रामध्ये तिला उत्पन्नाचे काहीही साधन नसल्याचे नमूद करते. अर्जदार ही सध्या तिच्या तीन मुलांसह माहेरी राहत असून, तिच्या व तिच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी तिच्यावरच

असल्याचे तिने नमूद केले आहे. अर्जदारचे उत्पन्नाचे कोणतेही स्वतंत्र साधन असल्याबाबत गैरअर्जदाराने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे, असे दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हीस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे तिने सकृतदर्शनी सिद्ध केले आहे.

१२. अर्जदार तिच्या अर्जामध्ये नमूद करते की, गैरअर्जदार याचा व्यवसाय शेती असून त्यास त्यातून उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार यांचेकडे सुमारे २.५ एकर ओलीताची शेती असून त्यापासून त्यांना उत्पन्न मिळते, असे अर्जदारने नमूद केले आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार यांच्या शेतावर मोबाईल टॉवर असून सदर मोबाईल टॉवरपासून गैरअर्जदार यास दरमहा रु.६,०००/– इतके उत्पन्न मिळते, असेही अर्जदारने नमूद केले आहे. गैरअर्जदार याने त्याचे म्हणणे मुदतीत दाखल केलेले नसल्यामुळे सदर कथनांना या टप्प्यावर कोणताही प्रतिवाद अभिलेखावर आलेला नाही. गैरअर्जदार याचेकडे शेती व मोबाईल टॉवरपासून उत्पन्नाचे साधन असल्याचे अर्जदारने सकृतदर्शनी दाखवून दिले आहे. अशाप्रकारे अर्जदार हिस स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी स्वतंत्र उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, तर गैरअर्जदार यास शेती व मोबाईल टॉवरपासून उत्पन्नाचे साधन आहे, ही बाब अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द केली आहे. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.३**

१३. मुद्दा क्र.१ च्या उत्तरावरुन अर्जदारवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झालेले आहे. मुद्दा क्र.२ च्या उत्तरावरुन अर्जदार स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे, तसेच गैरअर्जदार यास उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे, हे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरते.

१४. पोटगीची मात्रा ठरवित असताना दोन्ही कुटुंबांची सामाजिक परिस्थिती,

त्यांचे उत्पन्न, जबाबदाऱ्या, अर्जदार व तिच्या मुलांच्या गरजा, वाढती महागाई या सर्व बाबींचा विचार करणे गरजेचे असते. सद्य परिस्थितीमध्ये केवळ अंतरिम पोटगी ठरविणे आवश्यक आहे. अर्जदाराने तिला दरमहा रु.१०,०००/– इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

**१५.** उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता, अर्जाच्या चौकशीदरम्यान अर्जदारास तिच्या चरितार्थासाठी व तिच्यासोबत राहत असलेल्या तीन मुलांच्या पालनपोषणासाठी नक्कीच रकमेची आवश्यकता लागणार आहे. तिच्या अन्न, वस्त्र, निवारा, औषधोपचार व मुलांच्या शिक्षणाच्या मुलभूत गरजांसाठी अर्जदारास नक्कीच खर्च येणार आहे. उभय पक्षांनी एकमेकांवर केलेल्या आरोपांना जास्त महत्व न देता याक्षणी अर्जदाराच्या दैनंदिन गरजांची तसेच तिच्या मुलांच्या पालनपोषणाची सोय करणे हे न्यायाचे ठरणार आहे. त्यामुळे तिला काही प्रमाणात आर्थिक अनुतोष देणे गरजेचे आहे. अर्जदारच्या ताब्यात तिची तीन अपत्ये असून त्यांची देखभाल व पालनपोषणाची जबाबदारी अर्जदारवर आहे. सदर तीनही अपत्ये शिक्षण घेत असून त्यांचा अन्न, वस्त्र, शिक्षण व इतर आवश्यक खर्च भागविण्याची जबाबदारीही अर्जदारवरच येत आहे. त्यामुळे अर्जदार व तिच्या मुलांच्या पालनपोषणासाठी गैरअर्जदाराने आर्थिक सहाय्य करणे आवश्यक आहे.

**१६.** गैरअर्जदाराचे कुटुंब ग्रामीण भागातील असून गैरअर्जदार हा शेती व्यवसाय करीत असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार यांचेकडे सुमारे २.५ एकर ओलीताची शेती असून त्यापासून त्यास उत्पन्न मिळते, असे अर्जदारने नमूद केले आहे. तसेच गैरअर्जदार यांच्या शेतावर मोबाईल टॉवर असून त्यापासून त्यास दरमहा रु.६,०००/– इतके उत्पन्न मिळते, असेही अर्जदारने नमूद केले आहे. त्यामुळे गैरअर्जदार यास नियमित उत्पन्नाचे साधन असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. अर्जदार हिच्याकडे स्वतःचे कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे

साधन नसून तिच्या व तिच्या तीन मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी तिच्यावर आहे. त्यामुळे अर्जदारच्या व मुलांच्या मूलभूत गरजा, गैरअर्जदाराचे उत्पन्नाचे साधन, उभय पक्षांची कौटुंबिक परिस्थिती व एकूण परिस्थिती विचारात घेता, गैरअर्जदाराकडून अर्जदार हीस अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रु.६,०००/- (रुपये सहा हजार मात्र) मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, मुद्दा क्र.३ चे उत्तर त्यानुसार देण्यात येते.

**मुद्दा क्र.४:**

**१७.** वरील सर्व बाबींवरुन, अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. तसेच अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु.४,०००/- मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

(१) अर्जदाराची अंतरिम पोटगीची मागणी अंशतः मंजूर करण्यात येते.

(२) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ सह कलम २०(१)(घ) अन्वये, गैरअर्जदार याने अर्जदार हीस अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रु.६,०००/- (रुपये सहा हजार मात्र) अर्ज दाखल तारखेपासून द्यावेत.

(३) अर्जाचा खर्च म्हणून गैरअर्जदार याने अर्जदार हीस र.रु. ४,०००/-(रुपये चार हजार मात्र) द्यावेत.

(४) सदर अधिनियमाच्या कलम २०(४) नुसार प्रस्तुत आदेशाची प्रत ज्या ठिकाणी सामनेवाला राहतो त्या कार्यक्षेत्रातील संबंधीत पोलीस ठाणे यांना, तसेच सदर अधिनियमाचे कलम २४ नुसार, उभय पक्षकार, अर्जदार ज्या ठिकाणी राहतात त्या कार्यक्षेत्रातील संबंधीत पोलीस ठाणे, आणि संरक्षण

अधिकारी यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

SHAILESH RAJENDRA SATBHAI Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI Date: 2026.09.02 17:28:49 +0530

( एस. आर. सातभाई )

**दिनांकः**– ०२/०९/२०२६. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

सेलू.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)